**नियमित फौजदारी खटला क्रं. १९५/२०२२**
महाराष्ट्र शासन
विरुध्द
विश्वनाथ परांडे व इतर
सी एन आर क्रं. MHPA190009092022

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | – | १७.११.२०२२ |
| नोंदणी दिनांक | – | १७.११.२०२२ |
| निकाल दिनांक | – | १५.०९.२०२३. |
| कालावधी | – | वर्षे – महिने – दिवस<br>०० – ०९ – २९ |

# दुसरे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात, मानवत

(पिठासिन अधिकारी एस पी शिलवंत)

**नियमित फौजदारी खटला क्रं. १९५/२०२२**

सी एन आर क्रं. MHPA190009092022 निशाणी क्रं.

**अभियोग पक्ष** – महाराष्ट्र शासन,
व्दारा – पोलीस ठाणे अधिकारी,
मानवत पोलीस स्टेशन, ता. जि. परभणी

**अभियोग पक्षातर्फे** – श्री. आय ए पठाण
सहा. सरकारी वकील.

**आरोपींची नावे** –
१. **विश्वनाथ उर्फ विकास निवृत्ती परांडे**
वय ३० वर्षे धंदा – शेती

२. **बालासाहेब मधुकर परांडे**
वय २६ वर्षे धंदा – शेती
वरील रा. लासिना ता. मानवत जि. परभणी.

आरोपी तर्फे विधीज्ञ – श्री एस यु बारहाते

| | | |
|---|---|---|
| गुन्हयाची तारीख | – | दिनांक ०२.०४.२०२२ |
| गुन्हा नोंद | – | दिनांक ०२.०४.२०२२ |
| दोषारोप दाखल | – | दिनांक १७.११.२०२२ |
| दोषारोप निश्चीत | – | दिनांक ०४.०५.२०२३ |
| साक्षीदारांच्या साक्ष नोंदणी सुरु | – | दिनांक २९.०८.२०२३ |
| प्रकरण युक्तीवादासाठी | – | दिनांक १५.०९.२०२३ |
| प्रकरण न्यायनिर्णयासाठी | – | दिनांक १५.०९.२०२३ |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीन तारीख | गुन्हा | निकाल | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विश्वनाथ उर्फ विकास निवृत्ती परांडे | ०२.०४.२०२२ | ०३.०४.२२ | भा. दं. वि. कलम २९४, ३२७, ५०४, ५०६ | सर्व आरोपींना निर्दोषमुक्त केले. | — | लागु नाही. |
| २. | बालासाहेब मधुकर परांडे | ०३.०४.२०२२ | ०३.०४.२२ | | | | |

## भाग क
## (फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii) )
सरकारी / बचाव / न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### सरकारी साक्षीदारांची यादी

| क्रमांक | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | वचिष्ठ रावसाहेब धोपटे | फिर्यादी | २२ |

### बचाव साक्षीदारांची यादी

| क्रमांक | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| ................निरंक................ | | | |

### न्यायालयीन साक्षीदारांची यादी

| क्रमांक | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| ................निरंक................ | | | |

## सरकारी / बचाव / न्यायालयीन कागदपत्रावरील निशाणी यादी

अ. **सरकारी**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | २३/सा.क्र. १ | फिर्यादवरील सही पुरता. |
| २. | २४/सा.क्र. १ | एफआयआरवरील सही पुरता. |

ब. **बचाव**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | .................निरंक................. | |

क. **न्यायालयीन निशाण्या**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | .................निरंक................. | |

**मुद्देमाल**

| क्रमांक | मुद्देमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | बुलेट मोटरसायकल (सदर मुद्देमाल मुळ मालकास न्यायालयाच्या आदेशान्वये सुपूर्तनाम्यावर देण्यात आली ) |
| २. | १ | एक मेमरी कार्ड |
| ३. | १ | एल ई डी स्क्रीन |

**न्यायनिर्णय**
**(दिनांक १५ सप्टेंबर, २०२३)**

**१.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द भा. दं. वि. कलम २९४, ३२७, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाचा आरोप ठेवलेला आहे.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकिकत**

**२.** दिनांक ०२.०४.२०२२ रोजी दुपारी १२.०० फिर्यादी व इतर कामगार असे धक्यावर असतांना लासीन ता. सोनपेठ येथे आरोपी हे त्यांची बुलेट गाडी क्र. एमए च २२ ए एच ३२५८ वर दारु पिवुन आले व म्हणाले की, तुम्ही धक्का कसा चालवता ते पाहतो. आरोपींना समजावुन सांगुन तेथुन काढुन दिले. त्यानंतर आरोपी परत सायंकाळी ५.०० वाजता

तेथे आले अश्लील भाषेत मायघाले हो तुम्ही वाळुचा धक्का कसा चालवता ते पाहतो माझे पाच हजार रुपये दया असे म्हणुन लागले. आरोपी हे पत्र्याच्या शेडमध्ये जबरदस्ती घुसले आणि कम्प्युटरची एल सी डी स्क्रीन जबरदस्तीने हिसकावुन घेवुन मोटरसायकलवर बसुन निघुन गेले. सदर घटनेबाबत फिर्यादीने पोलीस स्टेशन मानवत येथे दि.०२.०४.२०२२ रोजी आरोपींविरुध्द फिर्याद दिली. सदर फिर्यादीवरुन आरोपींविरुध्द गु.र. क्र. ९२/२०२२ नोंदवण्यात आला.

३. सदरील गुन्हयाचा तपास जी एच शेख, पोलीस नाईक यांच्याकडे सोपवण्यात आला. त्यांनी तपासा दरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदवले. आरोपींना अटक करुन न्यायालयासमक्ष हजर केले. आरोपीं विरुध्द सबळ पुरावा हस्तगत झाल्याने आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. प्रस्तुत प्रकरणातील आरोपींविरुध्द नि. क्र. १९ वर भारतीय दंड संहिता कलम २९४, ३८०, ५०४ कायद्याप्रमाणे दोषारोप ठेवला. सदरचा दोषारोप आरोपींना वाचून व समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा कबुल न करता खटल्याची मागणी केली व त्यांनी त्यांचे विरुध्दचे दोषारोप पुर्णतः फेटाळले आहेत. संपरिक्षेदरम्यान आरोपीविरुध्द पुरावा न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदवण्यात आले नाही.

५. अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री आय ए पठाण व आरोपी तर्फे विधीज्ञ श्री एस यु बारहाते यांचा युक्तीवाद ऐकला व मौखिक पुराव्याचे अवलोकन करुन खालील विचारासाठीचे मुद्दे उपस्थित झाले विचारासाठीचे मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसहित खालील प्रमाणे देत आहे.

| **अ. क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि. ०२.०४.२०२२ रोजी १७.०० वाजता कुभांरी येथे आरोपींनी त्यांच्या सामाईक उद्देशाने फिर्यादीस अश्लील शिवीगाळ केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **...नाही.** |

| | | |
|---|---|---|
| २. | वरील नमुद वेळ,तारीख व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या सामाईक उददेशाने आरोपीने फिर्यादीच्या पत्र्याच्या शेडमधील कॉम्प्युटरची स्क्रीन चोरली हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **...नाही.** |
| ३. | वरील नमुद वेळ,तारीख व ठिकाणी आरोप ींनी त्यांच्या सामाईक उददेशाने फिर्यादी व साक्षीदारांना उददेशपुर्वक चिथावणी दिली किंवा सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे कृत्य केले हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **...नाही.** |
| ४. | अंतिम आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुददा क्रं १ ते ४ बाबत –**

**६.** मुददे क्रं १ ते ४ वरील पुरावे एकमेकांशी संलग्नीत असल्याने कारणमिमांसेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यावर एकत्रितरित्या विवेचन देत आहे.

**७.** अभियोग पक्षातर्फे सा.क्र. १ फिर्यादी यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये घटना सन २०२२ साली एप्रिल महिन्यात कुंभारी गावातील रेतीच्या धक्यावर सायंकाळी ४ ते ५ वाजेच्या सुमारास घडली. त्यादिवशी दोन्ही आरोपी एका दुचाकीवर रेतीच्या धक्यावर आले व रेतीच्या कारणावरुन बोलाचाली व बाचाबाची झाली. सदर साक्षीदार हा अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उत्तर सुचक प्रश्न विचारले. सदर साक्षीदाराने त्यास विचारलेल्या उत्तर सुचक प्रश्नांनामध्ये त्यांनी आरोपी सोबत त्यांची न्यायालयाच्या बाहेर तडजोड झाली असल्याचे कथन केले आहे.

८. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने केवळ फिर्यादी या साक्षीदाराचा पुरावा अभिलेखावर नोंदवला आहे. परंतु नोंदवलेल्या साक्षीदार क्रं. १ यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये त्यांनी आरोपी सोबत केवळ बोलाचाली झाली असुन या व्यतिरीक्त काहीही घडले नसल्याचे

कथन केले आहे. तसेच सदर साक्षीदारांनी त्यांना विचारलेल्या उत्तर सुचक प्रश्नांनामध्ये त्यांनी आरोपी सोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्याचे मान्य केले आहे.

९. अभियोग पक्षातर्फे प्रस्तुत प्रकरणातील तपास अधिकारी अथवा अन्य इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा पुरावा अभिलेखावर नोंदवण्यास असमर्थ ठरला. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील घटनास्थळ पंचनामा हा सिध्द होवु शकला नाही. प्रस्तुत प्रकरणातील तपासलेला एकमेव साक्षीदार फिर्यादी याचा पुरावा पाहता तो संशयापलीकडे दिसुन येत नाही. आरोपी व फिर्यादीमध्ये केवळ बोलाचाली झाली असल्याचे कथन केले आहे. परंतु सदर साक्षीदारांचा पुरावा आणि फिर्यादचे अवलोकन केले असता दोन्ही मध्ये विसंगती आढळुन येत असल्यामुळे सदर प्रकरणातील फिर्याद मधील मजकुर सिध्द होवु शकला नाही. तसेच अभियोग पक्षाने सदर साक्षीदारांना उत्तर सुचक प्रश्न विचारले असता सदर दोन्ही साक्षीदारांनी आरोपी सोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे प्रस्तुत सा. क्रं. १ यांच्या पुराव्यातुन अभियोग पक्षास मदत होईल असा कुठलाही पुरावा प्रस्तुत साक्षीदाराच्या पुराव्यातुन अभिलेखावर येवु शकला नाही. तसेच अभियोग पक्ष प्रकरणातील तपास अधिकारी यांचा पुरावा अभिलेखावर आणु शकला नाही. त्यामुळे प्रकरणातील आरोपींनीच सदरचा गुन्हा केला असे म्हणता येणार नाही.

१०. वरील सर्व विवेचनावरुन असे निदर्शनास येते की, फिर्यादी यांचा पुरावा हा आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द होईल अशी कोणतीही बाब सांगत नाही. व अभियोग पक्षाच्याकथनास दुजोरा मिळेल असा साक्षीदार अभियोग पक्षाने तपासला नाही. त्यामुळे आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना अश्लील शिवीगाळ करुन कॉम्प्युटरची स्क्रीन चोरुन उद्देशपुर्वक चिथावणी दिली हया बाबी निसंशयीतरीत्या सिध्द होवू शकत नाही. या सर्व कारणामुळे अभियोग पक्षातर्फे अभिलेखावर नोंदवण्यात आलेल्या पुराव्याव्दारे आरोपीविरुध्दचा गुन्हा निसंशयरित्या सिध्द होवु शकत नाही. त्यामुळे मुद्दे क्रं १ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवत येते.

**मुददा क्रं ५ बाबत**

**११.** मुददे क्रं १ ते ४ च्या नकारार्थी निष्कर्षावरुन असे स्पष्ट होते की, अभियोगपक्ष हा आरोपींविरुध्द गुन्हा शाबित करण्यात अयशस्वी ठरला आहे. त्यामुळे आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. प्रस्तुत प्रकरणात जप्त मोटरसायकलचा ताबा हा अपील कालावधीनंतर तो कायम करण्यात येतो. जप्त मुद्देमाल एल ई डी स्क्रीनची कोणीही मागणी केली नसल्यास अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट करावी. प्रस्तुत प्रकरणात संपरिक्षेदरम्यान आरोपी हे वेळोवेळी उपस्थित होते. त्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे केवळ वैयक्तिक बंधपत्र घेणे न्यायोचित होईल. अशा प्रकारे मुददा क्र. ५ च्या निष्कर्षात हे न्यायालय खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी **विश्वनाथ उर्फ विकास निवृत्ती परांडे, बालासाहेब मधुकर परांडे** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये, भारतीय दंड संहिता कलम २९४, ३८०, ५०४ या अपराधा मधुन दोषमुक्त करण्यात येते.

२. मोटरसायकलचा ताबा अपील कालावधीनंतर तो कायम करण्यात येतो.

३. जप्त एल ई डी स्क्रीन आणि ४ जी बी चे मेमरी कार्डची मागणी कोणी केली नसल्यास अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट करावी.

४. आरोपींचे वैयक्तीक बंधपत्रे व जातमुचलके रदद करण्यात येते.

५. आरोपींना असे निर्देशित करण्यात येते की, त्यांनी फौजदारी संहिता कलम ४३७(अ) अन्वये जमानती देण्यात यावेत.

**[न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला]**

SACHIN PRAKASH SHILWANT

Digitally signed by SACHIN PRAKASH SHILWANT
Date: 2023.09.18 11:53:51 +0530

मानवत.
दि. १५.०९.२०२३.

**एस पी शिलवंत.**
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मानवत